दैनिक आवाज़

सत्य, संवाद, संकल्प

# नाशिक येथे स्टार हेल्थच्या आपल्या पहिल्या विभागीय (झोनल) कार्यालयाचे उद्घाटन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक, २४ जून, २०२६: भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (छडए: डढ-ठक्रए-डढक, इडए: ५४३४१२) ने आज नाशिक येथे आपल्या पहिल्या विभागीय (झोनल) कार्यालयाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील वेगाने विकसित होत असलेल्या टियर-२ आरोग्य विमा बाजारपेठांपैकी एक असलेल्या नाशिकमधील कंपनीची गुंतवणूक या माध्यमातून अधिक दृढ झाली आहे. ग्राहकांना स्थानिक स्तरावर अधिक सुलभ सेवा उपलब्ध करून देणे, आरोग्यसेवा भागीदारांना सहाय्य करणे, दाव्यांच्या निराकरण प्रक्रियेला गती देणे आणि या भागातील स्टार हेल्थच्या विस्तृत सल्लागार नेटवर्कशी अधिक प्रभावी संवाद साधणे या उद्देशाने हे नवीन कार्यालय सुरू करण्यात आले आहे. स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री विजय अरोरा यांच्या हस्ते झोनल ऑफिसचे उद्धाटन करण्यात आले.

विस्तार होत असलेल्या आरोग्यसेवा परिसंस्थेमुळे नाशिक हे स्टार हेल्थसाठी प्राधान्याचे बाजारपेठीय केंद्र बनले आहे. वाढती आरोग्यजागरूकता, खाजगी आरोग्यसेवेची वाढती मागणी, वाढते वैद्यकीय खर्च आणि विस्तारत असलेले कॅशलेस हॉस्पिटल नेटवर्क यांमुळे आरोग्य विम्याचे महत्त्व अधिक वाढले आहे.स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्सचे पूर्णवेळ संचालक श्री. हिमांशु वालिया म्हणाले: नाशिक हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या टियर-२ आरोग्य विमा बाजारांपैकी एक आहे. वाढती आरोग्यजागरूकता, वाढते वैद्यकीय खर्च आणि शहरातच दर्जेदार उपचारांना मिळणारे वाढते प्राधान्य या घटकांमुळे हा विकास होत आहे. नाशिकमधील आमचे पहिले झोनल कार्यालय हे या महत्त्वाच्या बाजारपेठेतील ग्राहक, रुग्णालये, सल्लागार आणि समुदायांच्या अधिक जवळ राहण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.



महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २६ दरम्यान स्टार हेल्थने २,३०० कोटी रु. पेक्षा अधिक मूल्याच्या दाव्यांचे निराकरण केले असून ३.५ लाखांहून अधिक जणांना विमा संरक्षण दिले आहे. यामुळे राज्यातील कुटुंबांसाठी विश्वासार्ह आरोग्य विमा भागीदार म्हणून आमची भूमिका अधिक दृढ झाली आहे. आरोग्य विमा अधिक सुलभ, सोपा आणि विश्वासार्ह बनविण्यासोबतच आरोग्य सेवा केंद्रासारख्या उपक्रमांद्वारे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवालाही आम्ही अधिक बळकटी देत राहू.हा बदल आता प्रत्यक्ष स्तरावरही दिसून येत आहे. कॉर्पोरेट रुग्णालये, विशेषज्ञ क्लिनिक्स आणि नर्सिंग होम्स यांच्या पाठबळामुळे नाशिकमधील अधिकाधिक नागरिक शहरातच दर्जेदार आरोग्यसेवा घेण्यास प्राधान्य देत आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित पायाभूत सुविधा, उत्तम रस्ते संपर्क आणि तुलनेने कमी आरोग्यसेवा खर्च यांमुळे नाशिकमध्ये आसपासच्या जिल्ह्यांमधील आणि जवळच्या प्रदेशांमधील रुग्णही येत आहेत.

महाराष्ट्र आणि नाशिकमधील कंपनीच्या धोरणात्मक उद्दिष्टाविषयी बोलताना स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्सचे व्यवसाय प्रमुख श्री. विजय अरोरा म्हणाले: नाशिक झोनल कार्यालयाची रचना ग्राहक, सल्लागार आणि आरोग्यसेवा भागीदारांना क्षेत्रीय स्तरावर अधिक प्रभावी सहाय्य देण्यासाठी करण्यात आली आहे. मुंबई नाका येथील स्थानामुळे येथे सहज पोहोचता येते. तसेच ५,००० चौ. फूट क्षेत्रफळाचे कार्यालय, विस्तारित प्रशिक्षण पायाभूत सुविधा आणि परिषद कक्ष यांमुळे सल्लागारांची क्षमता वाढविणे आणि स्थानिक सेवा अधिक मजबूत करायला आम्हाला मदत होईल. या भागात ९,००० पेक्षा अधिक सल्लागार कार्यरत असून, हे कार्यालय नाशिक तसेच आसपासच्या बाजारपेठांतील कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, प्रथमच आरोग्य विमा घेणारे ग्राहक, रुग्णालये आणि व्यावसायिक भागीदार यांच्याशी अधिक सखोल संवाद साधण्यास मदत करेल.५,००० चौ. फूट क्षेत्रात पसरलेल्या आणि १५० हून अधिक व्यक्तींसाठीची क्षमता असलेल्या या झोनल कार्यालयात स्टार हेल्थच्या सल्लागार नेटवर्कसाठी प्रशस्त प्रशिक्षण आणि परिषद सुविधा उपलब्ध आहे.